कामाची मागणी



दिनांक - २९/११/२५

प्रति,

श्री.निलेश जी लंके साहेब,
मा.खासदार,
अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघ

**विषय: पाडळी दर्या येथील बौद्ध वस्तीतील समाज मंदिरासाठी सभामंडप मंजूर करण्याबाबत कळकळीची विनंती**

आदरणीय साहेब, सप्रेम नमस्कार,

आपण अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघाचे खासदार झाल्याचे वृत्त ऐकून आम्हा सर्व पाडळी दर्या येथील बौद्ध वस्तीतील रहिवाशांना मनस्वी आनंद झाला. आपल्या निवडीबद्दल आम्ही आपले शतशः अभिनंदन करतो। आपला विजय हा केवळ एक राजकीय विजय नसून, तो सर्वसामान्य जनतेच्या आशा-आकांक्षांचा आणि त्यांच्या स्वप्नांचा विजय आहे, अशी आमची प्रांजळ भावना आहे.

साहेब, आम्हीं पाडळी दर्या येथील सुमारे २०-२५ घरांची एक लहानशी बौद्ध वस्ती आहोत. इथे पिढ्यानपिढ्या आम्ही गावातील सर्व समाजा बरोबर गुण्यागोविंदाने राहत आहोत. आमच्या वस्तीमध्ये एक जुने समाज मंदिर आहे, जे आमच्यासाठी केवळ एक इमारत नसून, ते आमचे श्रद्धास्थान आहे, आमच्या एकजुटीचे प्रतीक आहे आणि आमच्या सुख-दुःखाचा सोबती आहे. ग्रामपंचायतीच्या सहकार्याने या मंदिराची वेळोवेळी दुरुस्ती केली जाते, हे आम्ही कृतज्ञतापूर्वक नमूद करू इच्छितो.

सध्या आमच्या समाज मंदिरात तथागत गौतम बुद्ध आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पवित्र मूर्ती प्राणप्रतिष्ठित आहेत.मंदिरातील जागेच्या मर्यादेमुळे, जेव्हा कधी आम्ही छोटे-मोठे कार्यक्रम, जयंती उत्सव, पुण्यतिथी सोहळे किंवा सामूहिक प्रार्थना आयोजित करतो, तेव्हा ती जागा अपुरी पडते. विशेषतः जेव्हा शाळेतील मुलांना शालेय वस्तूंचे वाटप असते किंवा इतर कोणतेही समाजोपयोगी कार्यक्रम असतात, तेव्हा जागेअभावी खूप अडचणी निर्माण होतात.

ग्रामपंचायतीने मंदिरासमोर सिमेंटची एक पडवी बांधून दिली आहे, त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. पण साहेब, त्या पडवीवर छत (शेड) नसल्यामुळे ऊन, वारा आणि पावसाचा मोठा त्रास होतो. या वर्षीच्या जयंतीलाच आम्ही हा अनुभव घेतला. विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप सुरू असताना अचानक पावसाने हजेरी लावली आणि अक्षरशः आमची धावपळ उडाली. मुलांची पुस्तके, वह्या भिजल्या, जेवणाचे पदार्थ खराब झाले आणि सर्वत्र गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. तो प्रसंग आठवला की आजही डोळे पाणावतात. आपली लहान मुले काही चांगलं घेत असताना त्यांना अशा परिस्थितीतून जावं लागणं हे मनाला खूप बोचून जातं.

साहेब, आपल्यासारखा संवेदनशील नेता लाभल्याने आमच्या मनात एक नवीं आशा निर्माण झाली आहे. भविष्यात असे प्रसंग पुन्हा येऊ नयेत, आमच्या लेकरांना उन्हातान्हात किंवा पावसात उभे राहून शिक्षणविषयक किंवा इतर कार्यक्रमात भाग घ्यावा लागू नये, यासाठी आम्हाला आपल्या मदतीची नितांत गरज आहे.

आमच्या समाज मंदिराला एक सुसज्ज सभामंडप मंजूर व्हावा, अशी आमची आपणास कळकळीची विनंती आहे. हा सभामंडप केवळ एक बांधकाम नसेल, तर तो आमच्या समाजाच्या प्रगतीचे आणि सन्मानाचे प्रतीक बनेल.

श्री. गोरख साळवे - 9762623506

आपण आमच्या या विनंतीचा गांभीर्याने विचार करून लवकरात लवकर सकारात्मक प्रतिसाद द्याल, अशी आम्हाला खात्री आहे. आपल्या एका निर्णयाने आमच्या संपूर्ण वस्तीचे भविष्य उज्वल होईल आणि आपल्या ऋणात राहू.

आपल्या प्रती कृतज्ञता व्यक्त करत,

आपले विश्वासू,

पाडळी दर्या येथील समस्त बौद्ध वस्तीतील रहिवासी,

1) गणेश जाधव —
2) विनोद के जाधव — V.K. Jadhav
3) ~~अविनाश डी. जाधव~~ —
4) सीमा ह. जाधव — Jadhav
5) श्रीरंग ए. जाधव
6) राहुल बाबनु जाधव
7) अरविंद बा. जाधव
8) रुपेंद्र गि. जाधव — R Jadhav
9) ~~विजय बी. जाधव~~ VJ Jadhav 6-7-25
10) दिलिप जाधव — Jadhav
11) Prem Kode
12) Bhushan. A. Jadhav — B Jadhav
13) शेखर जाधव —
14) किरण जाधव — K.V. Jadhav



ग्रामपंचायत हा लोकशाहीचा पाया आहे
स्वच्छतेतून... समृध्दीकडे...

# ग्रामपंचायत कार्यालय पाडळी दर्या

ता.पारनेर, जि. अहिल्यानगर

श्री.रामदास दत्तात्रय खोसे
सरपंच (मो ९३५९३३२७५२)

।। ग्रामपंचायत कर भरणे हे आद्य कर्तव्य ।।

श्री.मारुती जयवंत खोसे
उपसरपंच (मो ८०१०५८०६३२)

जावक क्रं.

दिनांक. १८/११/२०२५

## मागणी पत्र

मा.श्री. निलेशजी लंके साहेब
मा. खासदार ,अहिल्यानगर
लोकसभा सदस्य

विषय-पाडळी दर्या येथील बौद्ध वस्तीतील समाज मंदिरासाठी सभा मंडप मंजूर करण्याबाबत कळकळीची विनंती.
रिपोर्ट :-उपसरपंच/ग्रामपंचायत अधिकारी पाडळी दर्या
महोदय.

वरील विषयास अनुसरून विनंती पूर्वक रिपोर्ट करण्यात येतो की, पाडळी दर्या येथील बौद्ध वस्तीतील समाज मंदिरासाठी सभा मंडप मंजूर करण्यात यावे. हि नम्र विनंती.

सोबत :-१)ग्रामपंचायत मासिक सभा ठराव.
२)देखभाल दुरुस्ती दाखला.
३)ना हरकत दाखला.
४)इतर योजनेत काम नसलेबाबत दाखला.

ग्रामसेवक
ग्रामपंचायत पाडळी दर्या
ता. पारनेर, जि. अ. नगर

उपसरपंच
ग्रामपंचायत पाडळी दर्या
ता. पारनेर, जि. अहमदनगर



ग्रामपंचायत हा लोकशाहीचा पाया आहे

स्वच्छतेतून... समृध्दीकडे...

# ग्रामपंचायत कार्यालय पाडळी दर्या

ता.पारनेर, जि. अहिल्यानगर

श्री.रामदास दत्तात्रय खोसे
सरपंच (मो ९३५९३३२७५२)

॥ ग्रामपंचायत कर भरणे हे आद्य कर्तव्य ॥

श्री.मारुती जयवंत खोसे
उपसरपंच (मो ८०१०५८०६३२)

जावक क्र.

दिनांक.१८/११/२०२५

मासिकसभा ठराव

विषय क्र ६:- पाडळी दर्या येथील बौद्ध वस्ती येथे समाज मंदिरासाठी सभा मंडप मंजूर करणे बाबत.

ठराव क्र.६ :- वरील विषयास अनुसरून आजच्या सभेमध्ये हा ठराव घेण्यात आला की, पाडळी दर्या येथील बौद्ध वस्ती येथे समाज मंदिरासाठी सभा मंडप मंजूर करणे बाबत आजच्या सभेमध्ये चर्चा करण्यात आली.व चर्चा विनिमय होऊन सभा मंडप करणे बाबत कार्यवाही करण्यात यावी अशी सर्व सदस्यांनी सूचना करण्यात आली. असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सूचक:-श्री.विजय गंगाराम खोसे.

अनुमोदक:-सौ.सुरेखा सागर खोसे.

ग्रामसेवक
ग्रामपंचायत पाडळी दर्या
ता. पारनेर, जि. अ. नगर

उपसरपंच
ग्रामपंचायत [illegible]
ता. पारनेर, जि. अहमदनगर



ग्रामपंचायत हा लोकशाहीचा पाया आहे

स्वच्छतेतून... समृध्दीकडे...

# ग्रामपंचायत कार्यालय पाडळी दर्या

ता.पारनेर, जि. अहिल्यानगर

श्री.रामदास दत्तात्रय खोसे
सरपंच (मो ९३५९३३२७५२)

!! ग्रामपंचायत कर भरणे हे आद्य कर्तव्य !!

श्री.मारुती जयवंत खोसे
उपसरपंच (मो ८०१०५८०६३२)

जावक क्रं.

दिनांक १८/११/२०२५

देखभाल दुरुस्ती दाखला

उपसरपंच/ग्रामपंचायत अधिकारी यांसकडून दाखला देण्यात येतो की,मौजे पाडळी दर्या येथील बौद्ध वस्तीतील समाज मंदिरासाठी सभा मंडप हे काम पूर्ण झाल्यास त्याची देखभाल दुरुस्ती करण्यास ग्रामपंचायत तयार आहे.

सबब दाखला दिला असे.

ग्रामसेवक
ग्रामपंचायत पाडळी दर्या
ता. पारनेर, जि. अ. नगर

उपसरपंच
ग्रामपंचायत पाडळी दर्या
ता. पारनेर, जि. अहिल्यानगर

ग्रामपंचायत पाडळी दर्या स्थापना ता. पारनेर, जि. अ. नगर

नमुना नं. ८

पान क्र.----

## सन २०१९-२०२० ते २०२२-२०२३ या वर्षासाठी कर आकारणी नोंदवही

कार्यालय ग्रामपंचायत पाडळीदर्या ता. पारनेर जि. अ.नगर

| अ.क्र | रस्त्याचे नाव | सिटी सर्व्हे क्र. | मालमत्ता क्र | मालकाचे नाव | भोगवटादाराचे नाव | मालमत्तेचे वर्णन | मिळकत बांधकामाचे वर्ष | क्षेत्रफळ चौ. फुट/ चौ.मी. | रेडिरेकनर दर प्रति चौ.मि. (रुपये) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | जमीन | इमारत | बांधकाम |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| ५५८ | गावठाण | ० | ४०० | ग्रामपंचायत | स्वता: | खुली जागा | 2090 | — | ० | ० | ० |

| घसारा दर | इमारतीच्या वापरानुसार भारांक | भांडवली मुल्य (रुपये) | कराचा दर (पैसे) | कराची रक्कम रुपये | | | | | अपिलांचे निकाल आणि त्यानंतर केलेले फेरफार | | | | | नतर वाढ किंवा घट झाल्याच्या बाबतीत आदेशाच्या संदर्भासह शेरा (टीप- शेरा व दुरुस्त्या सरपंचाने अनुप्रमाणित कराव्यात.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | घरपट्टी कर | दिवाबत्ती कर | आरोग्य कर | पाणीपट्टी कर | एकूण | घरपट्टी कर | दिवाबत्ती कर | आरोग्य कर | पाणीपट्टी कर | एकूण | |
| १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ |
| — | 9.00 | — | — | ० | ० | ० | ० | ० | — | — | — | — | — | — |

दिनांक: २८-११-2024

सरपंच ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी ग्रा.प. पाडळीदर्या

ग्रामसेवक ग्रामपंचायत पाडळी दर्या ता. पारनेर, जि. अ. नगर

ग्रामसेवक ग्रामपंचायत पाडळी दर्या ता. पारनेर, जि. अ. नगर